खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरुनगर

ता. खेड, जि. पुणे

## द्वितीय वर्ष कला (SYBA)

## मराठी (जी - २)

## सत्र चोथे

## मराठी साहित्य : भाषिक कौशल्यविकास आणि आधुनिक मराठी

## साहित्यप्रकार : ललितगद्य (CC-1 D(3)A)

SANJAY MAR HRM

## घटक २) ‘साहित्यरंग’ पाठ्यपुस्तक

## लेख २) परिनिवृत्त 'विद्याभास्कर' मणिशंकर उपाध्याय :

## कॉम्रेड शरद पाटील

डॉ. संजय शिंदे
उपप्राचार्य व मराठी विभाग प्रमुख
हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरुनगर

ई - मेल : dr.sdshinde80@gmail.com भ्रमणध्वनी क्र. : 9604309060

## 'साहित्यारंग' पाठ्यपुस्तक

# २) परिनिवृत्त 'विद्याभास्कर' मणिशंकर उपाध्याय : कॉम्रेड शरद पाटील

### लेखक परिचय:

**प्राच्यविद्यापंडित, सत्यशोधक कम्युनिस्ट पक्षाचे संस्थापक आणि कृषी संस्कृती, बुद्धविचार व अब्राह्मणी** साहित्याचे सौंदर्यशास्त्र यांची नव्याने वैचारिक मांडणी करणारे, जातीव्यवस्थेविरोधात प्रखर लढा देणारे ज्येष्ठ विचारवंत. **'दास शूद्रांची गुलामगिरी'**, 'अब्राह्मणी साहित्याचे सौंदर्यशास्त्र', 'मार्क्सवाद-फुले-आंबेडकरवाद' अशा अनेक ग्रंथांचे लेखन त्यांनी केले आहे.

### प्रास्ताविक :

'परिनिवृत्त विद्याभास्कर मणिशंकर उपाध्याय' हा कॉम्रेड शरद पाटील यांचा आठवणीपर लेख आहे. यामधील काळ जुना आहे. **अशा काळातील शिकण्या - शिकविण्याचा अनुभव आणि एका विद्याव्यासंगी शिक्षकाचे व्यक्तीचित्र या लेखातून आपल्यासमोर उभे राहते. यामध्ये वयोवृद्ध, ज्ञानतपस्वी, अस्तिक, कर्मठ संस्कृत पंडित आणि बेचाळीस वर्षांचा प्रौढ, व्यावहारिक, नास्तिक, समाजवादी शिष्य असा विरोधाभास असणारी गुरु-शिष्याची आगळीवेगळी जोडी आहे. मात्र, या दोघांच्या ज्ञानविषयक निष्ठा समान आहेत. अनंतहस्ते नि:शुल्क ज्ञान देणारे पंडित मणिशंकर आणि ज्ञानाची लालसा असणारे, चिकित्सक लेखक यांच्यातील परस्परसंबंधातून ज्ञानाचे एक स्वतंत्र विश्व उभे राहते.**

### या लेखाचा आशय :

कॉम्रेड शरद पाटील यांनी **संस्कृतमधील 'पाणिनि' यांचे व्याकरण** शिकायचे ठरवले. त्यासाठी त्यांना मार्गदर्शकही तितकाच प्रकांडपंडित हवा होता. **मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे नेते कॉम्रेड चंदुभाई पटेल** यांच्या माध्यमातून गुजरातमधील **संस्कृत शिक्षक मणिशंकर उपाध्याय** यांची भेट झाली. त्यांनीही अत्यानंदाने **नि:शुल्क** शिकवायचे ठरवले.



SANJAY MAR HRM

पंडित उपाध्याय यांचे **व्यक्तिमत्त्व** साठीतही गोरेपान, तेज:पुंज होते. त्यांनी कमावलेल्या शरीरामुळे त्या वयातही त्यांच्यापुढे नतमस्तक होण्यासारखे प्रभावशाली होते. पंडितजींचे शिक्षण हरिद्वारच्या गुरुकुलात बारा वर्ष झाले. ते **जयश्री हायस्कूलमध्ये संस्कृत व संस्कृत महाविद्यालयात** 'न्याय' विषय शिकवीत होते. त्यांचे अनेक शिष्य सणावाराला त्यांचा चरणस्पर्श करून वस्तू व पैशाच्या स्वरूपात त्यांना भेट देत.

पंडितजींनी एका **विधवेशी विवाह** केला होता. परंतु त्यांच्या रागीट स्वभावामुळे पुढे त्यांच्या पत्नीला मानसिकदृष्ट्या वेड लागले होते. त्यांचा मोठा मुलगा **संस्कृतचा प्राध्यापक** होता. तर छोटा मुलगा मंदबुद्धीचा होता. त्याचे बी.ए. पर्यंतचे शिक्षणही झाले नव्हते.

**पंडितजींची वाड्मयीन श्रद्धास्थाने कविवर्य कालिदास व माघ ही दोन होती.**

**पंडितजींना राजकारण्यांचा कमालीचा तिटकारा होता.** सांख्य तत्त्वज्ञानावरचे त्यांचे श्लोकबद्ध भाष्य गुजरात सरकारने दुर्लक्षिले होते.

काळानुरूप संस्कृत शिकण्याविषयीच्या उदासीनतेबद्दल ते सदगदित होऊन बोलत असत. आयुर्वेदाचे काही विद्यार्थी त्यांच्याकडे पाणिनीचे संस्कृत श्लोकांचा अर्थ समजून घेण्यासाठी यायचे. याव्यतिरिक्त कोणाला संस्कृत शिकण्याचा उत्साह नव्हता. दहा वर्षानंतर तुमच्यासारखा विद्यार्थी संस्कृत शिकण्यासाठी आल्याचे ते म्हणत असत.

कॉम्रेड शरद पाटील यांच्यावर पुत्रवत प्रेम केले. त्यांचा **'पाटीलसाहब'** असा आदराने उल्लेख त्यांनी नेहमी केला. त्यांच्यावर पंडितजी कधी थेट रागावले नाही. पंडितजींच्या स्वभाव आणि शिकवण्याच्या तक्रारीवरून **जयश्री हायस्कूल आणि नंतर अशनिपात संस्कृत महाविद्यालयातून** त्यांना राजीनामा द्यावा लागला. परिणामी उदरनिर्वाहासाठी त्यांना **भिक्षुकी सुरू** करावी लागली. मग कॉम्रेड शरद पाटील यांनी पाणिनी शिकण्याचा ज्ञानयज्ञ मग स्वतःहून बंद केला.

पंडितजीनी स्वत: लिहिलेली संस्कृती तत्त्वज्ञानावरील **'ईश्वरस्वरूपम', 'चतु:सूत्री' व ब्रह्मसूत्र अशी तीन** श्लोकबद्ध भाष्य कॉम्रेड पाटील यांना भेट दिली होती. 'बंधुवर्ग श्रीयुत शरत् पाटीलजी को सप्रेम समर्पित' असा शेरा त्यांनी आपल्या हस्ताक्षरात लिहिला होता. **शिष्याला बंधुवर्य मानणारा हा आचार्य होता.**



SANJAY MAR FIRM

पंडितजींनी आपला पहिला ग्रंथ **गांधीजींना अर्पण** केला होता. तत्त्वज्ञानात ते **न्याय, सांख्य व वेदान्त** या तीन तत्त्वज्ञानाच्या समन्वयाचे समर्थक होते. **वर्णाश्रमधर्म व जातिव्यवस्था यांचे खंडन करून ते समतेचा पुरस्कार करणारे होते.** पंडितजींनी केलेल्या संस्कृत अध्ययनामुळे कॉम्रेड शरद पाटील यांना **'दासशूद्रांची गुलामगिरी'** हा ग्रंथ लिहिता आला. **हीच त्यांची पंडितजींना मृत्योत्तर गुरुदक्षिणा होती.**

## सारांश :

अशाप्रकारे वैचारिक भूमिका भिन्न असल्या तरी ज्ञाननिष्ठा समान असलेल्या पंडित मणिशंकर आणि कॉम्रेड शरद पाटील या अनोख्या गुरू-शिष्याची ही आठवण भेट वाचकाला संपन्न करते.

## अधिक संदर्भासाठी

### पाणिनि :

पाणिनि हे इ.स.पू. सुमारे पाचव्या किंवा चौथ्या शतकात होऊन गेले. संस्कृतातील पहिल्या सर्वांगसुंदर अशा व्याकरणाचे ते कर्ते होते. ४००० सूत्रे असलेल्या या व्याकरणग्रंथाचे आठ अध्याय असल्यामुळे त्याला 'अष्टाध्यायी' किंवा 'अष्टक' असे नाव रूढ झाले.

### अश्वघोष :

अश्वघोष हे इ.स.पहिल्या शतकात होऊन गेले. संस्कृतमधील एक महाकवी, नाटककार आणि बौद्ध तत्त्वज्ञ.

### कालिदास :

कालिदास हे इ.स. चौथ्या किंवा सहाव्या शतकात होऊन गेले असावेत. 'मेघदूत' हे त्यांचे खंडकाव्य व 'अभिज्ञानशाकुंतल' हे त्यांचे नाटक प्रसिद्ध आहे. 'कविकुलगुरू' म्हणून गौरविलेले संस्कृतातील एक श्रेष्ठ महाकवी होत.

### माघ

माघ हे कवी इ.स.सातव्या शतकामध्ये होऊन गेले. त्यांनी अभिजात संस्कृत पंचमहाकाव्यापैकी एक महाकाव्य 'शिशुपालवध'ची निर्मिती केली.

SANJAY MAR HRM

**भट्टोजी दीक्षित :**

भट्टोजी दीक्षित हे संस्कृत पंडित सतराव्या शतकामध्ये होऊन गेले. 'सिद्धांतकौमुदी' आणि 'प्रौढमनोरमा' हे त्यांचे ग्रंथ प्रसिद्ध आहेत.

----------------------------------------------------------------------------------------------------

**अध्यापन साहित्य निर्मिती :**

**डॉ. संजय शिंदे**

**हुतात्मा राजगुरू महाविद्यालय, राजगुरुनगर**

**संदर्भ ग्रंथ :**

**१) साहित्यरंग : डॉ. शिरीष लांडगे व इतर (संपादक)**

SANJAY MAR HRM